महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२३-२४/ 399 दिनांक:- 05 FEB 2024

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनाची (EBC) प्रभावि अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८ / तंशिसं/ EBC / २०२४/ ४८ दि. ०२/०२/२०२४

उपरोक्त विषयांन्वये सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेतील शै. वर्ष २०२३-२४ मधील “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” (EBC) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज डीबीटी पोर्टलवर (नवीन/नुतनीकरण) भरण्याकरिता तसेच संस्थेच्या लॉगीन ला प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढण्याबाबत आपणास वारंवार कळविण्यात येत आहे. परंतु अद्याप पर्यंत सदर अर्ज निकाली काढण्यात आलेले नसल्याचे डॅशबोर्ड वरुन निदर्शनास आलेले आहे. या वरुन असे लक्षात येते की, **महाडिबीटी पोर्टल वरील योजनेचा लाभ घेणे याबाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यत पोहोचविणे किंवा विद्यार्थ्याकडून नोंदणी करून घेण्यास संस्थास्तरा वरुन उदासिनता दिसून येत असून संस्थांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.** ही अत्यंत खेदाची बाब आहे.

या व्दारे आपणास सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध झालेली असल्याने सदर निधी आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२४ पूर्वी खर्च करण्यात यावा असे संचालनालयामार्फत निर्देशित करण्यात आलेले आहे. तरी संस्थांनी, संस्थास्तरावरुन विद्यार्थ्यांना सुचना देवून पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यात यावे. तसेच लॉगीन ला प्रलंबित असलेल्या अर्जाची छाननी करून मंजूरी करीता विभागीय कार्यालयास ऑनलाईरित्या पाठविण्यात यावे. जेणे करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदरहू शिष्यवृत्तीचा लाभ वेळेमुदतीत घेता येईल. संस्थेतील प्रवेशित विद्यार्थी कार्यवाही न केल्या मुळे शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाचालक व प्राचार्य यांची असेल याची नोंद घे ण्यात यावी.

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई, (कार्यासन क्र. १८) यांना माहिती करिता सविनय सादर.